

# गणेशोत्सव २०१४

# गणपती मंडळासाठी आचारसंहिता

दिनांक २९/०८/२०१४ ते ०८/०९/२०१४ या काळात गणेशोत्सव साजरा होणार आहे. या संपूर्ण उत्सवाचे काळात शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ज्याप्रमाणे आमच्यावर आहे, तशीच नैतिक जबाबदारी आपणांवरही आहे, या संपूर्ण काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याबद्दल आपले सहकार्यासाठी आम्ही आपणांस आवाहन करीत आहोत.

- **श्री मुर्ती स्थापना व आरास संदर्भात**

१. गणेश मंडळाने आपले मंडळ धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणी करुन घ्यावे.

२. गणपती स्थापने पूर्वीच सर्व मंडळांनी पोलीस परवाना घेणे बंधनकारक आहे.

३. पोलीस परवाना अर्ज स्विकृती त्या पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांचे अधिकारीतेत एक - खिडकी योजन मार्फत स्विकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

४. वर्गणी सक्तीने अगर वाहने अडवून जमा करु नये.

५. गणपती मंडप सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वानुसार रस्त्याचा १/३ भाग उपयोगात आणून बांधावा. मंडप बांधण्यापूर्वी गणेशोत्सव परवाना प्राप्त करावा.

६. मंडप व गणपती स्थापनेचे आसन मजबुत असावे. तसेच श्री मुर्तीचे पाऊस व आगीपासून संरक्षणाची काळजी घ्यावी. मुर्तीची स्थापना योग्य उंचीवर असावी.

७. गणेश मुर्तीची उंची मर्यादीत असावी, गणेश मुर्ती पारंपारिक असल्यास देखाव्याच्या उंचीची मर्यादा मर्यादीत असावी.

८. कार्यक्रमाच्या ठिकाणी आग प्रतिबंधक उपाययोजना उपलब्ध केलेली असावी. वाळुच्या बादल्या भरून ठेवाव्यात.

९. सजावटीमध्ये हॅलोजन सारखे प्रखर दिवे लावण्याचे टाळावेत. प्रेक्षक अथवा सुरक्षा रक्षकांच्या डोळयांवर प्रखर प्रकाश पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. मंडपातील रोशणाई व विद्युतीकरणाचे काम प्रमाणपत्र असलेल्या तज्ञ वायरमनकडून करुन घ्यावे. तसेच विद्युत मंडळाचे अधिका-यांकडून तपासणी करुन घ्यावी.

११. विद्युत प्रवाह खंडीत झाल्यास जनरेटर, बॅट-या उपलब्ध ठेवाव्यात.

१२. उत्सवामध्ये व मिरवणुकीमध्ये करण्यात येणा-या देखाव्याची माहिती अगोदर संबधीत ठाण्यात कळविणे आवश्यक आहे. वादग्रस्त ठरतील अशा विषयावर कार्यक्रम अगर देखावे/सजावटी सादर करु नयेत.

१३. संपूर्ण उत्सवाचे काळात मंडळाच्या ठिकाणी होणा-या कार्यक्रमाची यादी व रुपरेषा पोलीसांना आगाऊ कळवावी.

१४. ध्वनीक्षेपकाचा वापर सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या अटी नुसार करावा तसेच ध्वनी क्षेपकाची मर्यादा २ ओहम व ५००० आर.एम.एस. वॅट पेक्षा जास्त क्षमतेची असू नये.

१५. **ध्वनीक्षेपकाचा वापर शासनाने निश्चित केलेल्या ०५ दिवस व जिल्हाधिकारी यांनी निर्गमीत केलेल्या आदेशा प्रमाणे गुरूवार दि.०४/०९/२०१४ रोजी ते सोमवार दि.०८/०९/२०१४ रोजी पर्यंत सकाळी ०६.०० ते रात्रौ १२.०० वा पर्यंत करता येईल. इतर दिवशी ध्वनी क्षेपकाचा वापर सकाळी ०६.०० ते रात्रौ १०.०० वा. पर्यंतच करावा.**

१६. ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) व नियम २००० मधील परिच्छेद ४ चे तरतुदीप्रमाणे रूग्णालय, शैक्षणिक संस्था, न्यायालय, दवाखाने यांचे सभोवताली कमीत कमी १०० मीटरचे परिसरात ध्वनी क्षेपकाचा वापर करू नये.

१७. श्री च्या मुर्तीची व सजावटींची देखभाल करण्याकरीता मंडळाचे कमीत कमी **५ कार्यकर्ते** अथवा खाजगी सुरक्षा रक्षक **२४ तास** मंडपात नेमावेत.

१८. मंडळाची आरास व करमणूकीचे कार्यक्रम पाहण्यासाठी मंडपाच्यासमोर योग्य अंतरावर बॅरीकेडस किंवा दोर लावुन विभागणी करावी. येणा-या स्त्री - पुरुषांसाठी वेगवेगळी रांग लावण्यात यावी.

१९. मंडळाजवळ/मिरवणूकीमध्ये हजर असणारे स्वयंसेवक/कायकर्ते यांनी मद्य सेवन करु नये. मद्यसेवन केलेल्या व्यक्तीला मंडळाच्या मंडपा जवळ येण्यास प्रतिबंध करावा. तसेच कोणत्याही प्रकारचा जुगार खेळू नये.

२०. **मंडपामध्ये अथवा इतरत्र काही अनोळखी, संशयीत, बेवारस वस्तु उदा. सुटकेस, रेडिओ, मोठे घडयाळ, जेवणाचे डबे, सायकली वगैरे आढळून आल्यास अगर संशयीत व्यक्ती, इसम जवळपास फिरतांना रेंगाळतांना दिसल्यास ताबडतोब पोलीसांना कळवावे. सदर बाबत संयोजकांनी स्वयंसेवक/कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करावे.**

२१. देशात होणा-या दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मंडळाने मंडप परिसरात सुरक्षीत अंतरावर मजबुत बॅरीकेडींग करुन घ्यावे. कोणतेही वाहन मंडपापर्यंत पोहचणार नाही याची काळजी घ्यावी. मंडपाच्या सभोवतालच्या १०० मिटर अंतरा मध्ये कुठलेही वाहन पार्क होवू देवू नये.

२२. प्रत्येक मंडळा पुढे **"खिसे कापू पासून सावध रहा","अफवा पसरवू नका","स्त्रियांनी आपले दागीने सांभाळावेत","मुलांना एकटे सोडू नका"," आपले वाहन सुयोग्य ठिकाणी पार्क करा." "वाहनांत मौल्यवान वस्तू ठेवू नका "** या बाबतचे सुचना फलक लावावे.

२३. वर्गणी गोळा करण्याच्या नावाखाली नागरिकांवर, व्यापा-यांवर जोर, जबरदस्ती करू नये. मोठया रकमेची मागणी करू नये.

२४. गणेश मंडळाच्या मंडपामुळे पोलीसांचे वाहन, अग्निशामक गाड्या, रूग्णवाहिका यांना आणीबाणीच्या प्रसंगी घटनास्थळी पोहोचण्यास अडचण येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

२५. महत्वाच्या व गर्दी खेचणा-या गणेश मंडळांनी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवावेत व त्यांचे रेकॉर्डींग करावे.

२६. मौल्यवान दागिने असणा-या गणेश मुर्तीच्या संरक्षणाची विशेष काळजी संबधित मंडळांनी घ्यावी.

## ● विसर्जन मिरवणुकी संदर्भात

२७. गणेश विसर्जनाची मिरवणुक विहीत वेळेत संपवावी.

२८. मिरवणुकीतील देखावा अगर सजावट टेलिफोन व विदयुत तारांचा अडथळा होईल इतका उंच ठेवू नये.

२९. विसर्जन मिरवणुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने सुस्थितीत असल्याचा आर.टी.ओ.चा दाखला घ्यावा. वाहनाचा नंबर, चालकाचे नाव, पत्ता संबधीत पोलीस स्टेशनला कळवावा. प्रत्येक वाहनांमध्ये

आवश्यकता पडल्यास मंडळाचा स्वतःचा दोर वाहन ओढण्यासाठी ठेवावा.

३०. मिरवणुकीमध्ये बैलगाडी तसेच इतर प्राण्यांचा वापर टाळावा. प्राणी संरक्षण कायद्याचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३१. मिरवणूकीचे वेळी दोन मंडळांमध्ये जास्त अंतर पडू देऊ नये. योग्य अंतर ठेवावे.

३२. मंडळाचे वाहनांवर, मंडळाचे नांव ,पत्ता, अध्यक्ष, सेक्रेटरी यांची नांवे व मोबाईल नंबर असलेला बोर्ड लावावा. तसेच पोलीस स्टेशन कडून देण्यात आलेला परवाना क्रमांक १.५ बाय १.५ फुट बोर्डवर तयार करुन मंडपाच्या व मिरवणूकीतील वाहनाच्या दर्शनी भागावर लावावा.

३३. लहान मुलांना व पोहता न येणा-यांना पाण्याच्या आतमध्ये जाऊ देऊ नये.

३४. प्रत्येक मंडळाचे संयोजकांनी विसर्जन मिरवणुकीमध्ये कोणीही मद्यसेवन करुन आक्षेपार्ह वर्तन करणार नाही याची खबरदारी घ्यावी.

३५. गणेशोत्सव व गणेश विसर्जन मिरवणुकी काळात गुलालाचा कमीत कमी वापर करावा.

३६. मिरवणूकीत प्रक्षोभक व चिथावणी देणा-या तसेच जातीवाचक घोषणा देऊ नयेत.

३७. मिरवणुकीत कुठलेही धोकादायक खेळ तसेच शस्त्राचे खेळ करु नयेत.

३८. **प्रत्येक मंडळाला जास्तीत जास्त दोन बॉक्स कमानी उभारता येतील. बॉक्स कमानींची उंची २० फुटापेक्षा जास्त नसावी. बॉक्स कमानी गणेश मंडळांच्या १०० फूटाच्या आत असाव्यात. बॉक्स कमानींचा जमिनीपासून १० फूटा पर्यंतचा भाग चेकींगसाठी खुला ठेवावा.**

- **पोलीस मदतीसाठी संपर्क क्रमांक :-**

| | |
|---|---|
| नियंत्रण कक्ष | १०० / २६१२६२९६ / २६१२२८८० |
| पोलीस आयुक्त, पुणे शहर | २६१२५३९६ / २६२०८२०१ |
| पोलीस सह आयुक्त, पुणे शहर | २६१२२७८४ / २६२०८२०३ |
| अपर पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, पुणे शहर | २४४३०१४६ / २६२०८२०४ |
| अपर पोलीस आयुक्त, उत्तर विभाग, पुणे शहर | २५६७२७४५ / २६२०८४७९ |
| पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर | २६१२७३९७ / २६२०८२०२ |
| पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ | २४४५४४५० |
| पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ | २६३३४२४९ |
| पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ | २७४८७७७७ |
| पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ | २६६८४००१ |
| विशेष शाखा नियंत्रण कक्ष | २६२०८२८६ |
| जातीय विभाग | २६२०८२२३ |
| विशेष शाखा (प्रशासन) | २६२०८२४४ |

**पोलीस उप-आयुक्त,**
**विशेष शाखा, पुणे शहर**

जावक क्रमांक /२०१४

--------- पोलीस स्टेशन, पुणे शहर

दिनांक :-   /०८ /२०१४

**प्रति,**

**श्री.**

**विषय :- गणेशोत्सवात २०१४ ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरा बाबतची परवानगी**

उपरोक्त विषयान्वये आपणास गणेशोत्सव २०१४ दिनांक २९/०८/२०१४ ते दिनांक ०८/०९/२०१४ काळात खालील नमुद ठिकाणी आणि वेळेमध्ये ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मा.सर्वोच्च न्यायालय व **शासन निर्णय :-** ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या परिच्छेद ५ मध्ये उप नियम (३), दिनांक १२/०८/२०१४ नुसार अटी व शर्तीस आधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

१) ध्वनीक्षेपकाची वेळ दिनांक :- १. दि.२९/०८/२०१४ रोजी ते दि.०३/०९/२०१४ रोजी सकाळी ०६.०० ते रात्रौ १०.०० वा.पर्यत

२. दि.०४/०९/२०१४ रोजी ते दि.०८/०९/२०१४ रोजी सकाळी ०६.०० ते रात्रौ १२.०० वा.पर्यत

२) ध्वनीक्षेपण लावण्याचे ठिकाण :-

**<u>अटी व शर्ती</u>**

१) दिलेल्या मुदतीत आणि वेळेमध्येच ध्वनीक्षेपकाचा वापर करावा व आवाज मर्यादित ठेवावा.

२) ध्वनिक्षेपकाच्या भिंती उभ्या करू नयेत व आवाज मार्यादित ठेवावा.

३) ध्वनीक्षेपकासाठी कर्णे वापरू नयेत त्या ऐवजी दोनच बॉक्स वापरावेत.

४) ध्वनीक्षेपकातून येणा-या आवाजावर योग्य ते नियंत्रण ठेवावे. आसपासच्या रहिवाशांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) ध्वनीक्षेपणामुळे रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) आपले ध्वनीक्षेपक २ ओहम व ५००० आर.एम.एस.वॅट्स पेक्षा जास्त क्षमतेचे लावू नयेत. ध्वनी क्षेपकाचे उल्लघंन केल्यास पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ कलम १५(१) प्रमाणे गुन्हा असून उल्लघंन करणा-यास ५ वर्षे कैद व १ लाख रूपये दंड अशी शिक्षा आहे. या शिवाय भा.द.वि. कलम मुंबई पोलीस कायदयाखाली गुन्हा नोंद होवू शकतो.

७) ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० तरतूदी मधील परिच्छेद ४ प्रमाणे कोणत्याही परिस्थितीत कोणतेही वाद्य, ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक, रूग्णालये, शैक्षणिक संस्था, शासकिय कार्यालय आणि न्यायालयाच्या सभोवताली कमीत कमी १०० मी. च्या क्षेत्रात वापरू नयेत.

८) वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास सदरचा परवाना रद्द करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**

**----------- पोलीस स्टेशन,पुणे शहर**

जा.क्र.        /२०१४

---------पोलीस स्टेशन, पुणे शहर

दि. :-   /०८/२०१४

**सार्वजनिक गणेशोत्सव २०१४**

**पोलीस परवाना**

**(मुंबई पोलीस कायदा कलम ३३, ३६, ३७ व ६८ प्रमाणे)**

**प्रति,**

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

---------------------------------

**विषय :-** गणेशोत्सव २०१४ साजरा करण्यासाठी मंडप/लाऊडस्पिकर/वादय/विसर्जन मिरवणुकीचे परवानगी बाबत...

**संदर्भ :-** आपले कडील दिनांक ------------------------------------------------ चा अर्ज.

मी ---------------------------------वरिष्ठ पोलीस निरीक्षक ------------------- पोलीस स्टेशन पुणे शहर, मला मुंबई पोलीस कायदा कलम ३३, ३६, ३७ व ६८ प्रमाणे तसेच इतर कायद्यांप्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वरील विषयांसंबधी खालील अटी व शर्थीवर परवानगी देत आहे.

१. गणेशोत्सव मंडप ठिकाण ------------------------------------- हे असेल.
२. गणेशोत्सवासाठी घालण्यात येणा-या मंडपाचा आकार, लांबी ------, रूंदी ------, एवढा असावा.
३. सदर मंडपामुळे वाहतुकीला अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी.
४. मंडपाचा आकार रस्त्याचे रूंदीचे १/३ पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.
५. मंडपाचा प्रदर्शनीय भाग रस्त्याचे दिशेला नसावा.
६. मंडपाचे स्टेज पक्के व मजबुत असावे.
७. गणेश मुर्तीचे पावसापासुन, उन्हापासुन संरक्षण होईल याची दक्षता घ्यावी.
८. मंडपामध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी, त्यासाठी वाळूच्या व पाण्याच्या बादल्या भरून ठेवण्यात याव्यात व आग विझविण्याचे साधन (fire-extinguisher) ठेवावे तसेच त्या बद्दल अग्नीशामक दलाचे योग्य ते प्रमाणपत्र प्राप्त करून त्याची प्रत दि. २८/०८/२०१४ पर्यंत सादर करावी.

९. मंडपातील रोषणाई व विद्युत रोषणाईचे काम तज्ञ व्यक्तिंकडुनच करून घ्यावे व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांच्याकडुन कायदेशीररित्या विद्युत कनेक्शन घ्यावे त्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत दि. २८/०८/२०१४ पर्यंत सादर करावी.

१०. मंडपामध्ये जनरेटरची सोय ठेवावी. तसेच बॅटरी व गॅसबत्ती उपलब्ध ठेवावी.

११. उत्सवामध्ये व मिरवणुकीमध्ये सादर करण्यात येणा-या देखाव्यांची माहिती आगोदर संबधित पोलीस स्टेशनला कळवावी. वादग्रस्त अशा विषयांवर देखावे, सजावट, कार्यक्रम करणे टाळावे.

१२. संपुर्ण उत्सवाचे काळात मंडळाचे वतीने सादर करण्यात येणा-या कार्यक्रमांची यादी व रूपरेषा पोलीस स्टेशनला आगोदर कळवावी.

१३. ध्वनी क्षेपकाचे वापरासंबधी सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निर्देशांचे कसोशीने पालन करावे व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयाचा अवमान होईल असे कृत्य करू नये.

१४. **ध्वनीक्षेपकाचा वापर हा गणेशोत्सवामध्ये गुरूवार दि.०४/०९/२०१४ ते सोमवार दि.०८/०९/२०१४ (शासनाने निश्चित ४ दिवस व जिल्हाधिकारी यांचे अधिकार कक्षेतील उर्वरीत दोन दिवसांपैकी आणखी १ दिवस) असे एकुण ५ दिवस सकाळी ०६.०० ते रात्रौ २४.०० वा पर्यंत करता येईल. इतर दिवशी ध्वनी क्षेपकाचा वापर सकाळी ०६.०० ते रात्रौ १०.०० वा. पर्यंतच करावा.**

१५. ध्वनी क्षेपकाचा वापर सर्वोच्च न्यायालयाने ठरवुन दिलेल्या अटींनुसार करावा.

१६. श्रीं च्या मुर्तीची व सजावटीची देखभाल करण्याकरीता मंडळाचे कमीत कमी ५ कार्यकर्ते अथवा खाजगी सुरक्षा रक्षक २४ तास मंडपात नेमावेत व त्यांचा नाव, पत्ता व फोन नंबर पोलीस स्टेशनला कळवावा.

१७. मंडळाची आरास व करमणूकीचे कार्यक्रम पाहण्यासाठी मंडपाच्यासमोर योग्य अंतरावर बॅरीकेडस किंवा दोर लावुन विभागणी करावी. येणा-या स्त्री - पुरुषांसाठी वेगवेगळी रांग लावण्यात यावी.

१८. मंडळाजवळ / मिरवणूकीमध्ये हजर असणारे स्वयंसेवक / कायकर्ते यांनी मद्य सेवन करु नये. मद्यसेवन केलेल्या व्यक्तीला मंडळाच्या मंडपा जवळ येण्यास प्रतिबंध करावा. तसेच कोणत्याही प्रकारचा जुगार खेळू नये.

१९. **मंडपामध्ये अथवा इतरत्र काही अनोळखी, संशयीत, बेवारस वस्तु उदा. सुटकेस, रेडिओ, मोठे घडयाळ वगैरे आढळून आल्यास अगर संशयीत व्यक्ती, इसम जवळपास फिरतांना रेंगळतांना दिसल्यास ताबडतोब पोलीसांना कळवावे. सदर बाबत संयोजकांनी स्वयंसेवक/कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करावे.**

२०. देशात होणा-या दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मंडळाने मंडप परिसरात सुरक्षीत अंतरावर मजबुत बॅरीकेडींग करुन घ्यावे. कोणतेही वाहन मंडपापर्यंत पोहचणार नाही याची काळजी घ्यावी. मंडपाच्या सभोवतालच्या १०० मिटर अंतरा मध्ये कुठलेही वाहन पार्क होवू देवू नये.

२१. प्रत्येक मंडळापुढे **“खिसे कापू पासून सावध रहा”,“अफवा पसरवू नका”,“स्त्रियांनी आपले दागीने सांभाळावेत”,“मुलांना एकटे सोडू नका”,“ आपले वाहन सुयोग्य ठिकाणी पार्क करा.” “वाहनांत मौल्यवान वस्तू ठेवू नका ”** या बाबतचे सुचना फलक लावावे.

२२. वर्गणी गोळा करण्याच्या नावाखाली नागरिकांवर, व्यापा-यांवर जोर, जबरदस्ती करू नये. मोठया रकमेची मागणी करू नये.

२३. गणेश मंडळाच्या मंडपामुळे पोलीसांचे वाहन, अग्निशामक गाड्या, रूग्णवाहिका यांना आणीबाणीच्या प्रसंगी घटनास्थळी पोहोचण्यास अडचण येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

२४. सार्वजनिक गणेश मंडळांनी सीसी टीव्ही कॅमेरे, डी.एफ.एम.डी., एच.एच.एम.डी. चा मंडळांना भेट देणा-या नागरिकांच्या चेकींग करीता वापर करावा.

२५. मौल्यवान दागिने असणा-या गणेश मुर्तीच्या संरक्षणाची विशेष काळजी संबधित मंडळांनी स्वतः घ्यावी.

**२६. प्रत्येक मंडळाला जास्तीत जास्त दोन बॉक्स कमानी उभारता येतील. बॉक्स कमानीची उंची २० फूटा पेक्षा जास्त नसावी. बॉक्स कमानी गणेश मंडपाच्या १०० फुटाचे आत असावी. बॉक्स कमानीचा जमिनीपासून १० फूटापर्यंतचा भाग चेकींगसाठी खुला ठेवावा.**

## ● विसर्जन मिरवणुकी संदर्भात

२७. गणेश विसर्जनाची मिरवणुक विहीत वेळेत संपवावी.

२८. मिरवणुकीतील देखावा अगर सजावट टेलिफोन व विदयुत तारांचा अडथळा होईल इतका उंच ठेवु नये. देखाव्याची उंची जमिनीपासुन १४ फूटा पेक्षा जास्त व रूंदी १० फूटा पेक्षा जास्त नसावी.

२९. विसर्जन मिरवणुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने सुस्थितीत असल्याचा आर.टी.ओ.चा दाखला घ्यावा. वाहनाचा नंबर, चालकाचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक या बाबतची माहिति संबधीत पोलीस स्टेशनला कळवावी. प्रत्येक वाहनांमध्ये आवश्यकता पडल्यास मंडळाचा स्वतःचा दोर वाहन ओढण्यासाठी ठेवावा.

३०. मिरवणुकीमध्ये बैलगाडी तसेच इतर प्राण्यांचा वापर टाळावा. प्राणी संरक्षण कायद्याचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३१. मिरवणूकीचे वेळी दोन मंडळांमध्ये जास्त अंतर पडू देऊ नये. योग्य अंतर ठेवावे.

३२. मंडळाचे वाहनांवर, मंडळाचे नांव ,पत्ता, अध्यक्ष, सेक्रेटरी यांची नांवे व मोबाईल नंबर असलेला बोर्ड लावावा. तसेच पोलीस स्टेशन कडून देण्यात आलेला परवाना क्रमांक १.५ बाय १.५ फुट बोर्डवर तयार करुन मंडपाच्या व मिरवणूकीतील वाहनाच्या दर्शनी भागावर लावावा.

३३. लहान मुलांना व पोहता न येणा-यांना पाण्याच्या आतमध्ये जाऊ देऊ नये.

३४. प्रत्येक मंडळाचे संयोजकांनी विसर्जन मिरवणुकीमध्ये कोणीही मद्यसेवन करुन आक्षेपार्ह वर्तन करणार नाही. याची खबरदारी घ्यावी.

**३५. गणेशोत्सवाचे काळात व विसर्जन मिरवणुकी काळात गुलालाचा कमीत कमी वापर करवा.**

३६. मिरवणूकीत प्रक्षोभक व चिथावणी देणा-या तसेच जातीवाचक घोषणा देऊ नयेत.

३७. मिरवणुकीत कुठलेही धोकादायक खेळ तसेच शस्त्राचे खेळ करु नयेत.

३८. मिरवणुकीत दोन पेक्षा जास्त वाहने (१ देखाव्यासाठी व १ जनरेटरसाठी) सामील करू नये.

३९. मिरवणुकीचे वेळी प्रखर विद्युत झोताचा वापर करू नये.

४०. आपल्या विसर्जन मिरवणुकीत बाहेरच्या लोकांना सामील होवु देवु नये.

**४१.** दिनांक १३/०२/२०१० रोजी जर्मन बेकरी कोरेगाव पार्क येथे झालेला बॉम्बस्फोट, दिनांक १३/०७/२०११ रोजी मुंबई येथे झालेले तीन बॉम्बस्फोट, दिनांक ०१/०८/२०१२ रोजी जंगली महाराज रोड, डेक्कन, पुणे या ठिकाणी झालेले साखळी बॉम्ब स्फोट व दिनांक ११/०८/२०१२ रोजी मुंबई येथील सीएसटी रेल्वे स्टेशन परिसरात झालेली जातीय दंगल, दिनांक ३१/०५/२०१४ रोजी फेसबुकवरील महापुरुषांच्या विटंबनात्मक छायाचित्रे व मजकुर यावरुन पुणे पोलीस आयुक्तालयात उमटलेल्या प्रतिक्रिया व त्या अनुषंगाने झालेली जातीय दंगल, दिनांक १०/०७/२०१४ रोजी फरासखाना पोलीस स्टेशन समोर झालेला बाँम्ब स्फोट याचे पार्श्वभूमीवर संशयीत अतिरेकी व संशयीत लोक यांचेपासुन घडणारा संभाव्य धोका लक्षात घेवुन सुरक्षा विषयक उपाययोजनामध्ये कोणतीही तडजोड करू नये.

**४२.** मिरवणुकीमध्ये वाहनावर डॉल्बी सिस्टीम लावण्यावर व स्पिकरच्या भिंती उभारण्यास सक्त मनाई आहे.

**४३.** मिरवणुकीत सामील झालेल्या लोकांनी स्वतःबरोबर लाठया, काठया, शस्त्रास्त्रे, दगड धोंडे, स्फोटक पदाथे, नशीले पदार्थ जवळ बाळगु नयेत किवां त्याचा वापर करू नये.

**४४.** बंदोबस्त डयुटीवरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या आदेशाचे व सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४५. **दिनांक ०८/०९/२०१४ रोजी मिरवणुकीची वेळ सकाळी १०.०० ते रात्रौ. २४/०० वा. पर्यंत राहिल.**

विसर्जन मिरवणुकीचा मार्ग ----------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

असा राहील.

वरील सर्व अटींचे पालन करण्याची व गणेशोत्सव, गणेश विसर्जन मिरवणुक शांततेत पार पडण्याची जबाबदारी खालील व्यक्तीवर राहील.

| | |
|---|---|
| १. | ६. |
| २. | ७. |
| ३. | ८. |
| ४. | ९. |
| ५. | १०. |

हा परवाना आज दिनांक :-   /०८/२०१४ रोजी माझ्या सही शिक्यांनिशी दिला आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**----------- पोलीस स्टेशन, पुणे शहर**